पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 08/03/2020 (रविवार)
(सायंकाळ)

---

## फसवणुक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 3 कि मी अंतरावर वाघोडा सावनेर येथे दिनांक 21/02/2020 चे 11.00 वा. ते दिनांक 07/03/2020 चे 10.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे– अमर पुरुषोततम बागडे, वय 29 वर्षे, रा. नवीन गुजरखेडी वाघोडा वार्ड क्र 3 बुध्दमुर्ती जवळ सावनेर यांना आरोपी नामे– अर्जुनकुमार बद्रीप्रसाद व्यास, वय 29 वर्षे, रा. 30/444,1104 ईस्ट चंद्रनगरी कॉलनी मायलापुर तेलंगाना याने फ्लिपकार्ट एजन्सी देण्याचा आमीष दाखवून ईलेक्ट्रानीक संदेशवहनाचा वापर व बॅकेव्दारे ऑनलाईन व्यवहार करुन फिर्यादीकडुन एकुण 75,000/रु. व त्याचा साळा सचिन भानुदासजी पाटील कडून 15,000 /रु. असा एकुण कि. 90,000/–रू. लबाडीने फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(सी)माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. अशोक कोळी 9657811111 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील पाटणसावंगी सदभावना कॉलनी येथे दिनांक 07/03/2020 चे 17:30 वा. दरम्यान अज्ञात कार चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणारे सुरजसिंग शिवनारायण चव्हाण, वय 32 वर्षे, रा. नानंदवाडी, ता. पांढुर्णा मध्यप्रदेश यांना धडक दिली. या अपघातात सुरजसिंग शिवनारायण चव्हाण हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा उपचारा पुर्वी मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक श्री निशांत जुनोनकर 9923434524 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 07/03/2020 चे 20.30 वा. दरम्यान 30 वर्षीय फिर्यादी/पीडित हि घरी हजर असतांना आरोपी नामे– विक्की चौबे, रा. डब्ल्यु सि एल सावनेर याने तिला पाहुण स्कॉरपीओ गाडी बाजुला कर असे उध्दटपणे बोलुन फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करुन फिर्यादीच्या मागेमागे येवुन पाठलाग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 504, 294 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गौतम मेश्राम 9822545169 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा विकास नगर कोंढाळी येथे दिनांक 04/03/2020 चे 13.00 वा. दरम्यान सावन प्रतापसिंग बनाफर, वय 21 वर्ष, रा. विकास नगर कोंढाळी यांने दारूच्या नशेत विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता मेडीकल कॉलेज, नागपूर येथे दिनांक 04/03/2020 चे 04:30 वा. त्याचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रमोद वाळके, मेडीकल बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई उमेश हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मौजा कुंडी शिवार येथे दिनांक 07/03/2020 चे 15.30 वा. ते 17.30 वा. दरम्यान रोशन पिराजी कानझोडे, वय 24 वर्ष, रा. कुंडी, ता. काटोल जि. नागपूर हा नेहमी दारूच्या पिण्याचा सवयीचा असून त्याने किटकनाशक औषध प्राशन केले.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पिराजी पुडंलिकराम कानझोडे, वय 24 वर्ष, कुंडी ता. काटोल, जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई पन्ना 9607890994 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर